# कंत्राटी पदभरती 2025-26 जाहीरात क्र.1

NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA
NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

## जिल्हा एकात्मीक आरोग्य व कुटुंब कलयाण सोसायटी, राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा परिषद धाराशिव अंतर्गत कंत्राटी रिक्त पदभरती सन 2025-26

सार्वजनिक आरोग्य विभाग

| Sr. No. | Name of Cader | Place of Posting | Age (Upper Limit) | Total No of Posts | Category | Essential Qualification | Essential Experience | Remuneration (In Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Staff Nurse | DH/WH/RH/ SDH/ UHWC/PHC | For Open Category-38, For Reserved Cast Category-43 | 34 | SC-3<br>ST-1<br>VJA-2<br>SBC-2<br>OBC-8<br>SEBC-3<br>EWS-3<br>Open-12<br>**Total-34** | GNM / B.Sc. Nursing with Maharashtra Nursing Council Registration Certificate | - | Rs.20000/- |
| 2 | MPW (Male) | UHWC/ HBT Aapla Dawakhana | For Open Category-38, For Reserved Cast Category-43 | 3 | EWS-1<br>Open-2<br>**Total-3** | विज्ञान शाखेतुन उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परिक्षा किंवा शासनाने तिच्याशी समतुल्या घोषित केलेली इतर कोणतीही परिक्षा उत्तीर्ण केलेली आहे आणि विभागाच्या आरोग्य आणि कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र किंवा सावर्जनिक आरोग्य संस्था नागपुर यांच्याकडुन आरोग्य् कर्मचारी पदासाठी निश्चीत केलेली निववैद्यकिय मुलभुत प्रशिक्षण अभ्यासक्रम किंवा आरोगय व कुटूंब कल्याण मंत्रालयाने मान्यता दिलेल्या स्वच्छता निरिक्षक (सॅनिटरी इन्सपेक्टर) किंवा महाराष्ट शासनाने मान्यता दिलेल्या स्वच्छता निरिक्षक (सॅनिटरी इन्सपेक्टर) किंवा समकक्ष अभ्यासक्रम पुर्ण करुन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | | Rs.18000/- |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | LHV (Staff Nurse-(Female) NUHM | Urban Primary Health Center Dharashiv | For Open Category-38, For Reserved Cast Category-43 | 1 | EWS-1 **Total-1** | GNM / B.Sc. Nursing with Maharashtra Nursing Council Registration Certificate | - | Rs.20000/- |

**अटी व शर्ती:-**

1. MPW (Male) या पदाकरीता अर्ज सादर करताना उमेदवाराने आरोगय व कुटूंब कल्याण मंत्रालयाने मान्यता दिलेल्या स्वच्छता निरिक्षक (सॅनिटरी इन्सपेक्टर) किंवा महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या स्वच्छता निरिक्षक (सॅनिटरी इन्सपेक्टर) किंवा समकक्ष अभ्यासक्रम ज्या संस्थेमधुन पुर्ण केलेला आहे ती संस्था शासन मान्य प्रसिध्द केलेल्या यादीमध्ये असणे आवश्यक आहे. याबाबत शासन निर्णय कौशल्य, रोजगार, व नाविन्यता विभाग क्र. व्हिओसी-2023/प्र.क्र.45/ उदयोजकता/ मंत्रालय मुंबई दि.25/08/2023 (संकेतांक क्र. 202308251521490303) किंवा सचिव, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ मुंबई यांचे पत्र क्र. का.क्र. 12 / शैक्षणिक विभाग /2024 /394 दि.15-02-2024 किंवा शासकिय मान्यता असल्याचा पुरावा अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.
2. Staff Nurse या पदामधुन 2 पदे पुरुष उमेदवारामधुन भरण्यात येतील.
3. जाहीरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत व सामाजिक आरक्षणामध्ये कमी-जास्त बदल होऊ शकतो तसेच रिक्त पदांच्या ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो यानुसार पदभरती स्थगीत करणे /. रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार निवड समिती व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद धाराशिव यांनी राखून ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कसल्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.
4. जाहीरातीमधील पदे ही राज्य शासनाची नियमीतची पदे नसून सदरील पदे निव्वळ कंत्राटी स्वरुपातील आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु राहणार नाहीत. तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावून घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.
5. सदरील जाहीरात ही प्रकल्प अंमलबजावणी आरखडा सन 2024-25 मंजुरीनुसार प्रसिध्द करण्यात येत आहे.
6. अर्ज स्विकृतीच्या शेवटच्या दिनांकास उमेदवाराचे वय 18 वर्षापेक्षा कमी नसावे व कमाल वयोमर्यादापेक्षा जास्त नसावे. (खुल्या प्रवर्गासाठी 38 वर्षे व मागास प्रवर्गासाठी 43 वर्षे)
7. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी यांचेसाठी वयोमर्यादा शिथीलक्षम राहील. तथापि कागदपत्रे तपासणी दरम्यान सद्य स्थितीत कार्यरत असलेल्या कार्यालय प्रमुखांच्या स्वाक्षरीचे तशा प्रकारचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील. HR Policy नुसार वयोमर्यादा खालीलप्रमाणे राहील.

   The Calculation of age for the contractual year shall be on date of publishing of advertisement.

   (a) **Minimum Age :** No person shall be eligible for employment under National Health Mission, Maharashtra unless he/she has completed 18 years of age.
   (b) **Maximum Age for entry:-** Maximum age for entry shall be (1) 69 years for MO MBBS and specialists (2) 64 years for Nursing and Paramedical Staff and (3) For remaining posts 38 years for open category and 43 years for reserved category candidates.
   (c) No age bar for the employees already working under NHM and wish to apply for another post within NHM

(d) Applicants above 60 years are mandated to produce physical fitness certificate certified by civil surgeon

(e) all NHM employees should not have any administrative or financial proceedings, penal proceedings, criminal or any other type of serious crime against him during previous government service period

**Age limit for end of contractual service:-**

(f) The age limit for end of contractual service shall be (1)70 Years for MO MBBS and Specialists (2)65 Years for Nursing and Paramedical Staff and (3) 60 Years for remaining posts.

8. अर्जात हेतुपुरस्कार खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवुन ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा खोटे, बनवट प्रमाणपत्र सादर करणे इत्यादी प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करणेचा तसेच प्रचलित कायदा व नियमांचे अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करणेचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद धाराशिव यांना राहतील. तसेच विहीत केलेल्या अर्हतेच्या अटी पुर्ण न करणारा अथवा गैरवर्तणुक करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल.
9. सादर केलेली कागदपत्रे बनावट किंवा खोटी असल्याचे आढळुन आल्यास कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.
10. अर्जामधील माहिती व मुळ कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर केलेल्या कागदपत्रामध्ये फरक आढळुन आल्यास अर्जामधील माहिती अनधिकृत समजण्यात येईल. अर्जामधील माहिती संदर्भात कागदोपत्री पुरावे सादर करु न शकल्यास उमेदवाराची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रदद करण्यात येईल.
11. एस.एस.सी किंवा तत्सम प्रमाणपत्रावरील नावाप्रमाणे अर्ज इंग्रजीमध्ये भरावा. नाव बदलेले असल्यास याबाबत आवश्यक कागदपत्र सोबत सादर करावीत.
12. उमेदवाराने अर्जात स्वत:चे नाव, सामाजिक प्रवर्ग, कोणत्या प्रवर्गातुन अर्ज केला आहे तो प्रवर्ग, जन्मदिनांक, मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी इत्यादी माहिती काळजीपुर्वक भरावी.
13. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे उमेदवाराची पात्रता/अपात्रता तपासण्यात येईल व त्या आधारे त्याचा पुढील निवड प्रक्रियेमध्ये समावेश करण्यात येईल. उमेदवाराचा अर्ज स्विकारण्यात आला किंवा पुढील निवड प्रक्रियेत समावेश करण्यात आला म्हणजे उमेदवार त्या कंत्राटी पदासाठी पात्र आहे असा अर्थ होणार नाही. निवड प्रक्रियेदरम्यान कोणत्याही वेळी किंवा निवडीनंतर अर्जदार विहीत अर्हता धारण करीत नसल्याचे किंवा कोणत्याही कारणास्तव अपात्र ठरत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.
14. **अंतीम वर्षाच्या प्रमाणपत्रामध्ये ग्रेड अथवा श्रेणी नमुद असल्यास संबंधीत संस्थेकडुन त्याचे गुणांमध्ये रुपांतर करुन ते प्रमाणित करुन घ्यावे व त्याची प्रत अर्जासोबत जोडावी त्यानुसार अर्जात गुणांची टक्केवारी नमुद करावी व आपण निवडीस पात्र झाल्यास छाननी दरम्यान मुळ प्रत सादर करावी.**
15. शैक्षणिक प्रमाणपत्रात नमुद गुणांची टक्केवारी व अर्जात नमुद टक्केवारी न जुळल्यास असे अर्ज नामंजुर करण्यात येतील.
16. ज्या वैदयकिय/ निववैदयकिय पदाकरीता संबंधीत वैदयकिय/ निवमवैदयकिय परिषदेची नोंदणी अनिवार्य आहे. अशा अर्जादारानी संबंधीत परिषदेकडे नोंदणी केलेले प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावे व उमेदवार निवडीस पात्र झाल्यास छाननी दरम्यान सादर करणे आवश्यक आहे.
17. **अनुभवाचा तपशील -**

I. अर्ज करीत असलेल्या कंत्राटी पदाकरीता विहीत केलेली शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचा अनुभव ग्राह्य धरण्यात येईल. त्यानुसार शैक्षणिक अर्हता धारण करण्यापुर्वीच्या अनुभवाची नोंद करण्यात येऊ नये. त्या अनुभवाची दखल घेतली जाणार नाही.

II. प्रशिक्षर्थी म्हणुन काम केलेला अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

III. ज्या पदाकरीता अर्ज सादर केला आले त्या पदांशी संबंधीत असलेला खाजगी /शासकिय अनुभवाचा विचार पदभरती/ निवड प्रक्रियेत करण्यात येईल. या व्यतीरिक्त अनुभव असल्यास असा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

IV. ज्या पदाकरीता अनुभव आवश्यक आहे अशा पदाकरीता अनुभव असलेले उमेदवार पुरेशा प्रमाणात उपलब्ध न झालेस अनुभव अट शिथील करणे बाबत आवश्यक निर्णय घेण्याचा अधिकार निवड समितीस राहील.

V. अनुभवाचा तपशील नमुद करीत असताना ज्या कार्यालयाचे अनुभव प्रमाणपत्र प्राप्त आहे, अशाच कार्यालयाचा तपशील अर्जामध्ये नमुद करावा. अनुभव प्रमाणपत्र नसल्यास सदरचा अनुभव ग्राहय धरण्यात येणार नाही. अनुभव प्रमाणपत्रामध्ये अनुभवाचा कालावधी सुस्पष्टपणे नमुद करावा.

VI. अनुभवाचा तपशील नमुद करताना रुजु दिनांक व कार्यमुक्तीचा दिनांक अचुकपणे नमुद करावा. दोन्ही तारखा अनुभव प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्यात यावा. यामध्ये तफावत आढळल्यास अशा अनुभवाचा विचार करण्यात येणार नाही.

**18. अनुभव प्रमाणपत्र संबंधीत खालील कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित छायाकिंत प्रति जोडाव्यात.-**

I. **अनुभव प्रमाणपत्र दिलेल्या संस्थेची माहिती** - संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र दिलेल्या व्यवक्तीचे संस्थेतील पद, संबंधीत व्यवक्तीची शैक्षणिक अर्हता, संबंधीत व्यवक्तीची वैदयकिय/ निवमवैदयकिय परिषदेकडील नोंदणी क्रमांक इत्यादी.

II. **संस्थेमध्ये काम केलेला पुरावा** -1. नियुक्ती आदेश 2. हजेरी पत्रक 3. पगार पत्रक 4. पगार बॅंक खातेवर जमा झालेला बॅक खाते उतारा 5. बोनाफाईड प्रमाणपत्र इत्यादी. (यापैकी कोणतेही तीन कागदपत्रे)

III. वरील अ.क्र I व II मधील कागदपत्रे अर्जासोबत जोडावीत व निवड प्रक्रियेच्या वेळी मुळ कागदपत्रे छाननीसाठी साद करणे आवश्यक आहे.

IV. **वरील कागदपत्रे अर्जासोबत सादर केली नसल्सास अनुभवाचा विचार करण्यात येणार नाही.**

19. ज्या उमेदवारांनी यापुर्वी त्यांचे नाव रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय/ समाज कल्याण/ आदिवासी विकास प्रकल्प व इतर कार्यालयात नोंदविलेले आहे अशा उमेदवारांनी देखील स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे.

20. वरीष्ठ कार्यालयाचे मार्गदर्शक सुचना नुसार पदभरती प्रक्रियेमध्ये आवश्यक तो बदल करण्यात येईल यामध्ये पद संख्या. शैक्षणिक अर्हता, वय, प्रवर्ग व इतर यामध्ये बदल करण्याचे अधिकार निवड समितीस राहतील. याबाबत उमेदवाराचे कोणतेही म्हणने ग्राहय धरले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

21. अर्जदारास एकापेक्षा जास्त पदांकरीता अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज व स्वतंत्र डिमांड ड्राफ्ट सादर करावा.

22. सविस्तर जाहीरात, पात्र/अपात्र उमेदवारांची यादी, निवड/ प्रतिक्षा यादी व पदभरती प्रक्रीयेबाबची सर्व माहिती/सुचना राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा परीषद धाराशिव च्या नोटीस बोर्डावर, जिल्हा परीषद धाराशिव च्या https://zpdharashiv.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर, धाराशिव जिल्हयाच्या https://dharashiv.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल याबाबत

अर्जदारास कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार तसेच SMS, E-mail, दुरध्वनी संदेश केला जाणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

23. वरील पदांकरीता शासकीय सेवेतून सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी अर्ज सादर करीत असल्यास त्यांनी शासकीय सेवेत रुजू झालेचा दिनांक, कार्यकाळ, पदनाम, पदस्थापनेचे ठिकाण व सेवानिवृत्त झालेले वर्ष, सेवा निवृत्तीच्या दिनांकास मिळालेले अंतिम वेतन व सेवा निवृत्ती नंतर देय असलेले वेतन (पेन्शन) याबाबतची संपुर्ण माहिती अर्जामध्ये नमुद करावी व संबंधीत कागदपत्र सोबत सादर करावीत.

24. कागदपत्र तपासणी अथवा मुलाखतीस बोलविलेल्या उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवास/दैनिक भत्ता अनुदेय राहणार नाही. उमेदवाराने स्वखर्चाने कागदपत्र तपासणी /मुलाखतीस उपस्थित राहावे.

25. IPHS अंतर्गत येणारी पदे ही ज्या ठिकाणी नियमीतची पदे रिक्त आहेत अशा ठिकाणी नियमीतचे कर्मचारी मिळेपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल.

26. **निवड प्रक्रिया:- उमेदवाराची खालील निकषानुसार गुणांकन यादी तयार करण्यात येईल.**

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying Exam मधील गुण (अंतीम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या गुणाच्या टक्केवारीचे 50 टक्के प्रमाणे proportion नुसार (उदा. 60 % गुण प्रापत असल्यास त्याचे 50 % प्रमाणे proportion= 60*50/100=30) | 50 गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधीत विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी) | अधिकतम 20 गुण<br>मिळालेल्या गुणाच्या टक्केवारीचे 20 टक्के प्रमाणे proportion नुसार (उदा. Staff Nurse पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पुर्ण करुन अतिरिक्त् B.Sc (Nursing) ही शैक्षणिक अर्हता पुर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास B.Sc (Nursing) च्या अंतीम वर्षात 60 % गुण प्राप्त असल्यास त्याचे 20 % प्रमाणे proportion= 60*20/100=12) | 20 गुण |
| संबंधीत पदाशी निगडीत अनुभंव (शासकिय/खाजगी) | प्रत्येक 1 वर्षासाठी 6 गुण (1 वर्षाकरीता 6 गुण, जास्तीत जास्त 30 गुण ) | 30 गुण |
| | | एकुण 100 गुण |

उपरोक्त गुणांकन पध्दीतनुसार निवड प्रक्रिया राबविण्यात येईल.

27. गुणांकन पध्दतीनुसार समान गुण असल्यास ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे अशा उमेदवारास प्राधान्य् देण्यात येईल. भरती प्रक्रियेमध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे सर्व अधिकार निवड समितीस राहतील. याबाबत उमेदवारास कोणत्याही उमेदवारचे म्हणणे विचारात घेतले जाणार नाही.

28. निवड झालेल्या उमेदवारांना रु.100/- चे बॉन्ड् पेपरवरती विहीत नमुन्यात करारनामा सादर करावा लागेल.

29. **अर्ज शुल्क** : खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रु.150/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी रु.100/- चा राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट स्वरुपात अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. डीडी च्या मागे स्वत:चे नाव व पदाचे नाव लिहावे. सदरचा डिमांड ड्राफ्ट (डीडी) "DISTRICT HEALTH AND FW SOCIETY OSBD OTHER PROGRAM " या नावे देय असलेला असावा.

30. **अर्ज सादर करण्याचा कालावधी व ठिकाण :**

I. सोबत देण्यात आलेल्या नमुन्यातील अर्ज, डिमांड ड्राफ्ट, व आवश्यक शैक्षणिक कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित छायांकित प्रति व इतर कागदपत्रांच्या छायांकीत सत्यप्रतीसह आपले अर्ज दिनांक २५/०७/ 2025 पासुन दिनांक ०५/०८/ 2025 रोजी सायंकाळी 6:15 वाजेपर्यंत व्यक्तीश: अथवा पोस्टांने कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) **अर्ज जिल्हा शल्यचिकित्सक यांचे नावे जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, शासकिय वैदयकिय महाविदयालय व रुग्णालय मारवाडी गल्ली, धाराशिव -413501 येथे सादर करावेत.**

II. टपालाद्वारे सादर केले जाणारे अर्ज हे फक्त अर्ज सादर करणेच्या शेवटच्या दिवसापर्यंतच स्विकारले जातील. त्यानंतर टपालाद्वारे प्राप्त होणारे अर्जाचा विचार केला जाणार नाही तसेच सदर अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

31. **अर्जासोबत सादर करावयाचे कागदपत्रे** :- शैक्षणिक अर्हतेबाबतची सर्व प्रमाणपत्रे व सर्व गुणपत्रिका, जातीचे प्रमाणपत्र, चालु आर्थिक वर्षाचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, अनुभव प्रमाणपत्रे, एमएससी-आयटी उत्तीर्ण प्रमाणपत्र, EWS-10% आरक्षणाचे वैध (सन 2025-26) प्रमाणपत्र, वैद्कीय / निम वैद्कीय पदांकरीता संबंधीत वैद्कीय/ निम वैद्कीय परिषदकडे नोंदणी (Council Registration) केल्याचे प्रमाणपत्र, लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र व इतर आवश्यक प्रमाणपत्रे सादर करावीत.

**नोट- अर्जदाराने अर्जामध्ये नोंदविलेल्या माहिती संबंधीतचे सर्व कागदपत्रे आणि प्रमाणपत्रे तसेच शैक्षणिक अर्हता, अनुभव व इतर आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत स्वयंसाक्षाकित केलेल्या छायांकित प्रति सादर कराव्यात. तेच कागदपत्रे/ प्रमाणपत्रे निवड प्रक्रियेसाठी विचारात घेतली जातील व छाननी दरम्यान मुळ कागदपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. अर्ज सादर करणेचा कालावधी संपुष्ठात आलेनंतर प्राप्त झालेले कागदपत्रे/ प्रमाणपत्रे ग्राहय धरले जाणार नाहीत तसेच मुदतीनंतर प्राप्त झालेले कागदपत्रे/ प्रमाणपत्रे स्विकारण्याकरीता अर्जदारास कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.**

जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक तथा
सदस्य निवड समिती
रा.आ.अ.जिल्हा परिषद धाराशिव

जिल्हा प्र. व बाल आ. अधिकारी तथा
सदस्य निवड समिती
जिल्हा परिषद धाराशिव

Dhananjay

जिल्हा शल्यचिकित्सक तथा
सदस्य निवड समिती
जिल्हा परिषद धाराशिव

जिल्हा आरोग्य अधिकारी तथा
सदस्य सचिव निवड समिती
जिल्हा परिषद धाराशिव

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
अध्यक्ष निवड समिती
जिल्हा परिषद धाराशिव